https://mail.google.com/mail/u/0/#inbox?projector=1
8/22/2019
20190822_123900.jpg

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI
## NATIONAL SERVICE SCHEME

**District Co-ordinator**
Dr.Narendra T. Arekar
Mob No: 9421731083
E-Mail :narenarekar@gmail.com

**District President**
Dr. P. Katkar
Mob.No.: 9422906289
E-mail: pkatkar@gmail.com

जावक क्र

दि. ३०/०७/२०१९

प्रति,

मा.प्राचार्य / रासेयो कार्यक्रम अधिकारी ( जिल्हा–गडचिरोली)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली सलग्नित

सर्व रासेयो महाविद्यालये.

विषय : 'आव्हान'–आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व प्रजासत्ताक दिन पथसंचलन (RD /SRD) पूर्व प्रशिक्षणाकरिता जिल्हास्तरीय निवड शिबीरातील सहभागाबाबत.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, दिल्ली येथे राष्ट्रीय व मुंबई येथे राज्यस्तरावर संपन्न होणाऱ्या प्रजासत्ताक (२६ जानेवारी २०२०) दिन पथसंचलनात सहभाग घेण्याकरीता पथसंचलन पूर्व प्रशिक्षण जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबीर आयोजित करून रासेयो स्वयंसेवक विद्यार्थ्यांची निवड करावयाची आहे. तसेच जून २०२० मध्ये होणाऱ्या 'आव्हान'–आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरासाठीही स्वयंसेवकांची निवड याच शिबीरातून करावयाची आहे.

सदर जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबीर शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली येथे दिनांक २६ ऑगस्ट २०१९ रोज मंगळवारला सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

या निवड शिबीरात सहभागासाठी विद्यापीठाच्या रासेयो कार्यपुस्तिकेत पृष्ठ क्र. १४ व १५ मध्ये नमूद केलेल्या नियम व अटींच्या अधिनस्त आपल्या महाविद्यालयातील ०२ रासेयो स्वंयसेवक व ०२ रासेयो स्वयंसेविकेंची महाविद्यालय स्तरावर निवड करून नियोजित स्थळी दिलेल्या वेळेवर शिबीरात सहभागी करून सहकार्य करावे; ही विनंती.

धन्यवाद!

**शिबीर स्थळ : शिवाजी महाविद्यालय,गडचिरोली** दि. २६ ऑगस्ट २०१९, मंगळवार

टीप: ०१) प्रजासत्ताक दिन पथसंचलन पूर्व प्रशिक्षणाकरीता स्वयंसेवकाचे रासेयोतील दुसरे वर्ष अनिवार्य आहे.
०२) आव्हान–२०१९ करीता प्रथम व व्दितीय वर्षातील रासेयोचे स्वयंसेवक सहभागी होऊ शकतात
०३) सहभागी विद्यार्थ्यांसोबत सहभागाबाबतचे महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे पत्र असावे.
०४) स्वयंसेवकांचा प्रवास खर्च हा महाविद्यालयीन नियमीत रासेयो अनुदानातून करावा.
०५) सहभागी स्वयंसेवकांच्या अल्पोपाहाराची व्यवस्था केलेली आहे.

डॉ. नरेंद्र तु. आरेकर
रासेयो, जिल्हा समन्वयक,
जिल्हा– गडचिरोली

प्रति,
मा.प्राचार्य / कार्यक्रम अधिकारी
संलग्नित सर्व महाविद्यालय जिल्हा- गडचिरोली
उपरोक्त प्रमाणे महाविद्यालय स्तरावर स्वयंसेवक / स्वयंसेविकेंची निवड करुन जिल्हा स्तरीय निवड शिबिरात रासेयो स्वंयसेवक सहभाग घेण्याकरिता प्रोत्साहित करावे.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली